सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पशुसंवर्धन विभाग
जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,कार्यालय हिंगोली
District Deputy Commissioner Of Animal Husbandry,Akola Road Hingoli 431 513
E..Mail : dccahhingoli@gmail.com

जा. क्र.जिपसंउआहिं/तां/ जिकृरेकें/ द्र.वा. /1265/ 2026 हिंगोली दि-10.08.2026

प्रति,

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,हिंगोली

**विषय** :-द्रवनत्र वाहतुकीचा दरकरार करणेसाठी दरपत्रक मागविण्याबाबतची नोटीस जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणे बाबत .

**संदर्भ** :- सआपसंदुला /तां-2/968/2026 लातूर विभाग लातूर यांचे पत्र दिनांक - 07/ 08 / 2026

**महोदय,**

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरून आपनास विनंती करण्यात येते की ,जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, हिंगोली येथील द्रवनत्र वाहतुकीचा दरकरार करणे साठी दरपत्रक प्रक्रिया समिती गठीत समिती मार्फत करण्यात येणार आहे.सदरिल द्रवनत्र वाहतुकीचा दरकरार करण्यासाठी दरपत्रक दिनांक 12/ 08 / 2026 ते दिनांक 19 / 08 / 2026 सांयकाळी 5.00 वाजेपर्यत मागविण्यात येत आहेत. दरपत्रके सादर करणाऱ्या वाहतुकदारांचा दरपत्रक लिफाफा जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालय येथे दि. . 20/08/2026 सकाळी ठिक 10.30 वाजता गठित समिती समोर दरपत्रक उघडण्यात येतील .दरपत्रके मागविण्याची नोटीस सोबत देण्यात येत आसुन ती जिल्हा परिषदेच्या संकेतस्थाळावर प्रसिध्द करण्यात यावी. ही नम्र विनंती .

**सोबत** :- दरपत्रक प्रक्रियेची नोटीस

(डॉ. एस.टी.बुच्चाले)
जिल्हा उपआयुक्त,
पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय
हिंगोली

Scanned with OKEN Scanner

## निविदा

सर्व टाटा -407 वाहन धारकास कळविण्यात येते ,कि पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र शासन मा.जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय हिंगोली अंतर्गत जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र हिंगोली सन 2026-2027 (01जुलै-2026 ते 30 जुन-2027) या कालावधी करिता द्रवनत्र व रेतमात्राची वहातुक खालील दर्शविलेल्या प्रमाणे करावयाची आहे. करिता दरपत्रक करार पध्दतीने मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पुरवठयाचा मार्ग 407 वहान | द्रवनत्र पुरवठा करावयाचे एकुण पशुवैद्यकिय संस्था | अंदाजे अंतर कि.मी. |
|---|---|---|---|
| 1 | हिंगोली ते वसमत तालुका | 16 | 240 |
| 2 | हिंगोली ते कळमनुरी तालुका | 12 | 230 |
| 3 | हिंगोली ते औढा ना.तालुका | 16 | 200 |
| 4 | हिंगोली ते सेनगाव तालुका | 13 | 220 |
| 5 | हिंगोली ते हिंगोली तालुका | 12 | 130 |
| 6 | हिंगोली — छ. संभाजी नगर/ लातूर/पुणे किंवा होईल तेथून गरजे नुसार वीर्यमात्रा/ लसमात्र/ औषधी/ टॅग इत्यादी साहित्य आणणे | | 440 |

हिंगोली — छ. संभाजी नगर/ लातूर/पुणे येथून रेतमात्रा किंवा विषाणूजन्य व जिवाणूजन्य प्रतिबंधक लस आणण्याकरिता वाहनाची आवश्यकता आहे.दरपत्रक धारकास सुचित करण्यात येते की,दर पत्रक भरतेवेळी रु.10000/- (रु.दहा हजार) अनामत रक्कम धनादेशाव्दारे मा.जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय हिंगोली यांचे कार्यालयात जमा करावी.निविदा धारकानी अटी व शर्तीच्या अधिन राहून निविदा सादर करावी.

निविदा स्वीकारण्याचा कालावधी :- 12/08/ 2026 ते दिनांक 19/08/2026 या कालावधीत दरकरार मा.जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय,अकोला रोड हिंगोली येथे स्वीकारण्यात येतील.

टिप :- दिनाक 19 / 08 / 2026 सायंकाळी 5 वाजे नंतर निविदा (दर करार) स्वीकारण्यात येणार नाहीत याची वाहनधारकांनी दक्षता घ्यावी .

आदेशावरून

Scanned with OKEN Scanner

## जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालय हिंगोली

### द्रवनत्र, गोठित रेत मात्रा व इतर अनुषंगीक साहित्य वाहतुकीसाठीचे नियम व अटी

### विभाग - अ

१. दरकरार सन २०२६-२७ **दिनांक १ जूलै २०२६ ते ३० जून २०२७** या एका वर्षाच्या कालावधीसाठी आहे.

२. दरपत्रका द्वारे भरणे आवश्यक आहे.

३. तांत्रिक बीड मध्ये वाहन व व्यवसायासंबंधी खालील कागदपत्रांच्या छायांकित (Xerox) प्रती साक्षांकित करून ऑनलाईन अपलोड करणे आवश्यक आहे. आणि **मूळ प्रती** दरकरार पत्रक उघडण्याच्या वेळी खात्री करण्यासाठी सोबत आणणे बंधनकारक आहे. तसेच दरपत्रक उघडतेवेळेस **वाहन** आणणे बंधनकारक आहे.

| वाहनाचे नोंदणी प्रमाणपत्र | रोड टॅक्स प्रमाणपत्र | GST क्रमांक प्रमाणपत्र |
|---|---|---|
| सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचे आयकर परतावा प्रमाणपत्र/पॅन कार्ड | वाहनाचा विमा अद्यावत असलेबाबत, | फिटनेस प्रमाणपत्र, |
| निवीदा अर्जाचे शुल्क व अनामत रक्कम ऑनलाईल भरल्याबाबत पावती. | पासिंग प्रमाणपत्र व मालकी हक्क दस्तावेज | क्लिअरंस प्रमाणपत्र |
| इतर आवश्यक कागदपत्रे जसे पी.यु.सी | नियम व अटी मान्य असणेबाबत | वाहतुक परवाना. |

४. कंत्राटदार ज्या वाहनाने वाहतूक करणार आहे, ते वाहन त्याच्या स्वत:च्याच मालकीचे असावे. कोणत्याही तातडीचे प्रसंगी हिंगोली मुख्यालयास संपर्क साधता येईल असा पत्रव्यवहाराचा व संपर्काचा पत्ता द्यावा.

५. तांत्रिक लिफाफया मधील सर्व कागदपत्रांची पुर्तता व पडताळणी अंती योग्य असणाऱ्या दरपत्रक धारकांचीच व्यासायिक लिफाफा उघडण्यात येईल.

६. द्रवनत्राची रिकामी किंवा भरलेली पात्रांची वाहतूक ही हिंगोली जिल्हयाच्या अंतर्गत खालील विवरणपत्रात दर्शविलेल्या मार्गानूसार त्या मार्गातील दिलेल्या संपूर्ण कृत्रिम रेतन केंद्रांना द्रवनत्र पुरवठा करण्याच्या दृष्टीने वाहतूक करावी लागेल. तसेच लातूर किंवा औरंगाबाद येथून किंवा ज्यांच्याशी द्रवनत्र पुरवठयाचा भावबंद करार होईल त्या ठिकाणाहून द्रवनत्र आणून पुरवठा करावा लागेल.

| अक्र | पुरवठयाचा मार्ग 407 वहान | द्रवनत्र पुरवठा करावयाचे एकुण गावे ( उपकेंद्रे ) | | | अंदाज अंतर किमी |
|---|---|---|---|---|---|
| | | नियमित केंद्र | सेवादाता केंद्रे | एकुण | |
| 1 | हिंगोली – लाख, जामगव्हाण, नांदापुर, पोत्रा, शिरळी, वाई(गोरखनाथ), चोंढी आंबा, धामनगाव,बोरळा, कुरूंदा, गिरगाव, पळसगाव, वाखारी, खांडेगाव, वसमत, | 15 | 1 | 16 | 240 |
| 2 | हिंगोली – खानापूर, टाकळी, मसोड, कळमनुरी, मोरगव्हाण, वाकोडी, कोंढूर, साळवा, येहळेगाव (तु), आखाडा बाळापुर, वारंगा, डोंगरकडा, रामेश्वर तांडा, बोंथी | 14 | 0 | 14 | 230 |
| 3 | हिंगोली – संतुक पिंपरी, येहळेगाव(सो), मु. सावंगी, औढा नागनाथ,शिरड शहापुर, टेंभूर्णी, सातेफळ, हयातनगर, पळशी, आरळ, हट्टा, आडगाव रंजे, जवळा बाजार, सळणा, उखळी, | 15 | 1 | 16 | 200 |
| 4 | हिंगोली – देऊळगाव रामा, भोसी, पुसेगाव, नर्सी ना., सेनगाव, कवठा, वरुड चक्रपान, हत्ता, कापडसिनगी, साखरा, पानकन्हेरगाव, आजेगाव, केंद्रा, गोरेगाव, उमरा | 15 | 2 | 15 | 220 |
| 5 | हिंगोली – भांडेगाव, आडगाव (मु), हिंगोली, फाळेगाव, कन्हेरगाव नाका, माळहिवरा, सिरसम, पळसोना, चिंचोली, बासंबा | 10 | 0 | 10 | 130 |
| 6 | हिंगोली – छ. संभाजी नगर/ लातूर/पुणे किंवा होईल तेथून गरजे नुसार वीर्यमात्रा/ लसमात्र/ औषधी/ टॅग इत्यादी साहित्य आणणे | 0 | 0 | 0 | 440 |
| | **एकुण** | **69** | **4** | **71** | 1460 |

७. हिंगोली जिल्ह्यासाठी आवश्यक असणारी विषाणू, जीवाणू रोगप्रतिबंधक लस व इतर साहित्य आणण्यासाठी आपल्या वाहनाचा पुरवठा करणे आवश्यक आहे त्यासाठी वाहना सोबत ३ मजूर व्यक्ती असणे आवश्यक आहे. या करिता वेगळी आकारणी (हमाली) देण्यात येणार नाही.

८. जर काही कारणाने द्रवनत्र मिळाला नाही व तो संपूर्ण ७ दिवस मिळू शकत नसेल तर फक्त एकेरी वाहतूक भाडे मिळेल. (जाण्याचे ) जर दुस-या दिवशी किंवा तिस-या दिवशी मिळत असेल तर त्या दिवसाकरीता मुक्काम करावा लागेल. **अशावेळी मुक्कामाचे भाडे देण्यात येणार नाही.**

Scanned with OKEN Scanner

९. वाहतूकीचे वाहन नेहमी सुस्थितीत ठेवणे आवश्यक आहे. तसेच **सुस्थितीत** नविन खरेदी केलेले असावे व निविदा उघडण्याच्या वेळी **मूळ कागदपत्रासह** तपासणी साठी **वाहन** उपलब्ध करून द्यावे.

१०. वाहतूकीच्या वाहनामध्ये **किमान २० एम.एम. कॉयर मॅटींग नरम आच्छादनाचा वापर करणे आवश्यक आहे.** यामूळे द्रवनत्र पात्रांचे कोठेही नूकसान होणार नाही तसेच **वाहनाच्या वरील बाजूने टॉप झाकलेले असावे**, ज्यामूळे ऊन, वारा, पाऊस यापासून संरक्षण मिळेल.

११. आवश्यकतेनूसार लातूर किंवा औरंगाबाद किंवा जेथून द्रवनत्राचा पुरवठा केला जाईल तेथून **५१ लीटर क्षमतेचे ३६ ते ४८ द्रवनत्र पात्रे** भरून आणण्याची व्यवस्था दरकराराच्या वाहनामध्येच करण्याची जबाबदारी वाहतूक ठेकेदाराची राहील. त्याकरीता वाहनामध्ये लाकडी फळया लावून दुसरा मजला तयार करून द्रवनत्र पात्रे सुरक्षीतपणे वाहतूक करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

१२. द्रवनत्र पात्राची वाहतूक करतांना त्या वाहनामध्ये कार्यालयाचा एक प्रतिनिधी राहील. निविदाधारकास कमीत कमी **दोन व्यक्ती** द्रवनत्र पात्रे चढ - उतार करण्यासाठी तसेच कार्यालयाच्या मुख्यालयी टँकर आले तेंव्हा द्रवनत्र भरण्यासाठी तीन व्यक्ती घ्यावी लागतील. त्याकरीता कोणताही वेगळा आकार (हमाली) देण्यात येणार नाही.

१३. दरकरार करण्यात आलेल्या द्रवनत्र पुरवठ्याच्या वाहनामध्ये प्रवास करणाऱ्या एक अधिकारी दोन कर्मचारी यांचा वाहतूक दाराकडून विमा स्वखर्चाने काढावा लागेल.

१४ या कार्यालयातून औषधीसाठा,लसमात्रासाठा,व वेळोवेळी या कार्यालयाने सांगितलेल्या इतर साहित्याचा पुरवठा सांगितलेल्या ठिकाणी करावा लागेल. त्यासाठी तीन मजूर व्यक्ती असणे आवशक आहे. त्या करिता कोणताही वेगळा आकार (हमाली) देण्यात येणार नाही.

## विभाग - ब

१५. यशस्वी ठेकेदारास निविदा मंजूर झाल्यापासून ७ दिवसाचे आत **रू. १०,०००/- सुरक्षा ठेव** (सिक्यूरीटी डिपॉझीट) जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, हिंगोली यांच्या नावांने चलनाद्वारे शासकीय कोषागारात भरावे लागेल, त्याच बरोबर कार्यकृतीची हमी पूर्ण करण्याबाबत रू. १००/- च्या कोर्ट स्टॅम्प पेपरवर लिहून द्यावी लागेल त्याशिवाय ठेका मंजूर केला जाणार नाही.

१६. एका पेक्षा अधिक वाहने एकाच वेळी या कार्यालयाकरीता तसेच या कार्यालया अंतर्गत इतर संस्थेस वाहन लागल्यास मान्य केलेल्या दराने वाहन उपलब्ध करून देणे बंधनकारक राहील. अशा वेळी मुख्य ठेकेदारा व्यतीरिक्त दुस-याचे वाहन असू शकतील मात्र वाहतूकीची जबाबदारी ही मुख्य ठेकेदाराची राहील.

१७. वाहतूकीच्या वेळी **वाहनातील कि.मी. रीडींग सूरू असणे आवश्यक आहे.** त्यानूसारच देयकाची रक्कम अदा करण्यात येईल.

१८. संबंधित वाहनात इंधन, ऑईल, ग्रीस इ. वाहतूक ठेकेदारास स्वखर्चाने भरावे लागेल. व काही कारणाने इंधनाची दर वाढ झाल्यास दरवाढ मिळणार नाही.

१९. वाहतूक करीत असताना शासकीय कामास्तव केंद्रावर किंवा कार्यालयास थांबण्याच्या कालावधीकरीता कोणताही वेगळा आकार देण्यात येणार नाही. शासकीय प्रतिनिधीला कामाच्या स्वरूपानूसार केंद्रावर थांबता येईल तो पर्यंत वाहन तेथे उभे करावे लागेल.

२०. द्रवनत्र वायु हा अतिथंड असतो. त्यामूळे वातावरणाशी संबंध येतांना त्यापासून ज़ी वाफ निघते, पण थंड असते. हा वायु स्फोटक नाही याची माहिती ठेकेदारानी पूर्णपणे करून घ्यावी.

२१. वेळोवेळी शासकीय नियमातील काही बदलामूळे जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, हिंगोली यांनी केलेल्या सुचना व अटीचे पालन ठेकेदारांना करावे लागतील. दरपत्रकधारकांची कोणतीही अट मान्य करता येणार नाही, अन्यथा निविदा फेटाळल्या जातील, तसेच सर्व कार्यालयीन आर्थिक व्यवहार स्वतः ठेकेदारास करावे लागतील. प्रतिनिधी चालणार नाही.

## विभाग –क

२२. ठेकेदाराचा ठेका मंजूर झाल्यास परंतू नियमाप्रमाणे काम न केल्यास, दुसरा ठेका जादा दराने मंजूर करावा लागल्यास मूळ ठेकेदाराच्या सुरक्षा ठेव रकमेतून फरकाची रककम वसूल करण्यात येईल.

२३.निविदा भरतांनी निविदा धारकास नियम व अटि पूर्ण वाचून त्या समजावून घेवून त्यांना मान्य आहे असे समजून त्यावर स्वाक्षरी करावी लागेल.

२४.संपूर्ण निविदा स्विकारणे, मंजूर करणे अथवा नाकारणे इत्यादी बाबतीत सर्व संबंधित अधिकार निविदा समितीस राहील, व समितीचा निर्णय अंतीम व बंधनकारक राहील.

२५.जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, हिंगोली यांना ठेकेदाराचे काम समाधानकारक न आढळल्यास ते बंद करण्याचे व तसेच दुसरे वाहन लावून कार्यवाही करण्याचा अधिकार राहील. अशा वेळी सुरक्षा ठेव, अनामत रक्कम शासन जमा करण्यात येईल.

२६.वाहनाचा वेग तासी ४० कि.मी. पेक्षा जास्त नसावा, तसेच मद्यपान करून चालक वाहन चालवित असल्यास किंवा अनावश्यक वाहनाचा वेग मर्यादेचे उल्लंघन केल्यास. तसेच मद्यपानाच्या कायदेशीर कार्यवाहीस सामोरे जावे लागेल, त्यामूळे शासकीय संपत्तीचे नूकसान झाल्यास ठेकेदारास नूकसान भरपाई द्यावी लागेल.

२७.निविदा समितीसमोर स्वतः निविदाधारकाने वेळीच आक्षेप घेतल्यास त्यावर विचार करता येईल, परंतू निविदा समितीसमोर कोणताही आक्षेप न घेता जर एखादे न्यायालयीन प्रकरण उद्भवले तर निविदा धारकावर संबंधित प्रकरणाची जबाबदारी राहील.ज्या

Scanned with OKEN Scanner

निविदा धारकास न्यायालयात जायाचे आहे किंवा तक्रार करावयाची आहे त्यानी अंतीम निर्णय होईपर्यंत त्यांचे कॉल डिपॉझीट कार्यालयाचे ताब्यात राहील. कॉल डिपॉझीट परत घेतल्यास निविदा धारकाची कोणतीही तक्रार नाही असे समजण्यात येईल.

२८.जिल्हा अंतर्गत वाहतूक करतांना जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, हिंगोली यांचे आदेशानूसार ठरवून दिलेल्या मार्गानेच वाहतूक करावी लागेल. यासबंधी उद्‌भवणारे वाद किंवा तक्रारीचे निराकरण करण्याचे अंतीम अधिकार कार्यालय प्रमुख यांना राहतील.

२९.ज्या निविदा धारकांचा क्रमांक दुसरा राहील त्याची अनामत रक्कम एक महिन्यानंतर परत करण्यात येईल.इतरांची अनामत रक्कम त्वरीत परत करण्यात येईल. क्रमांक एक ने ठेका नाकारल्यास त्याचा कॉल डिपॉझीट जप्त करण्यात येईल व दुस-या क्रमांकांच्या निविदेस मान्यता देण्यात येईल.

३०.काही कारणास्तव सन २०२७-२८ पुढील नविन वर्षाचा ठेका पुढे ढकलला गेल्यास नविन ठेका होईपर्यंत सन २०२६-२७ या वर्षांच्या जून्याच दराने ठेकेदारास वाहतूकीचे काम करावे लागेल, आणि वाहतूकीचे देयक नियमितपणे सादर करावे लागेल.

३१.जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, हिंगोली यांनी ठरविलेल्या कार्यक्रमानूसार व मागणी प्रमाणे सर्व दृष्टीने सुस्थितीत असलेले वाहन उपलब्ध करून न दिल्यास, संबंधित वाहतूकीकरिता बाहेरील दुसरे वाहन कोणतेही उपलब्ध दराने मिळविण्यात येईल व त्याकरीता लागणारे जास्तीचे भाडे वाहतूक ठेकेदाराच्या देयकातून वसूल करण्यात येईल.

३२.वाहन उपलब्ध करून देण्याबाबत सर्वसाधारण १२ तासापुर्वी सुचनां देण्यात येईल, आकस्मिक परिस्थितीत वेळेवर वाहन बोलाविण्यात येईल. पुर्व सुचनां देवूनही वाहन वेळेवर उपलब्ध करून देण्यास टाळाटाळ करीत आहेत असे आढळून आल्यास वाहनधारकास प्रत्येक वेळी कमीत कमी रू.१०००/- व जास्तीत जास्त रू.५०००/- दंड आकारण्यात येईल व तो दंड त्यांच्या देयकातून वसूल केला जाईल.

३३.वाहतूक करीत असतांना कोणत्याही वाहन परीवहन नियमाविषयक नियमांचे किंवा पोलीस कायद्यानूसार नियमांचे उल्लंघन झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदारावर राहील व वाहन जप्त किंवा इतर कार्यवाहीसाठी खोंळबून ठेवल्यास, वाहतूकीसाठी दुसरे पर्यायी वाहन उपलब्ध करून त्यामध्ये द्रवनत्र पात्रांची वाहतूक करून द्यावे लागेल.

३४.वाहतूक करीत असतांना संबंधित वाहनात ठेकेदाराच्या अधिकृत प्रतिनिधी शिवाय कोणतेही प्रवासी किंवा प्रवासी- सामान घेवू नये. असे आढळल्यास कमीत कमी रू.१०००/- व जास्तीत जास्त रू.५०००/- दंड आकारण्यात येईल.

३५.वाहतूकीचे वाहनामध्ये कॉयर मॅटींग नरम आच्छादनाचा वापर करणे आवश्यक आहे.तसेच वाहनास हुड आवश्यक आहे. ही व्यवस्था नसल्यास प्रत्येक फेरीत निविदा धारकास रू.१०००/- दंड आकारण्यात येईल व हा दंड त्याच्या देयकातून वसूल करण्यात येईल.

**३६.कोणत्याही कारणास्तव वाहतूकीचा संप झाल्यास त्याकरीता या कार्यालयाच्या कार्यक्रमाच्या पत्रासह निविदाधारकाने पोलीस संरक्षण उपलब्ध करून घेणे आणि द्रवनत्र वाहतूक सुरळीत करून घेणे ही जबाबदारी ठेकेदाराची राहील. कारण या सेवा अत्यावश्यक आहेत.**

**३७.प्रत्येक वाहतूकीच्या वेळी द्रवनत्र पात्रे वाहन चालकाच्या ताब्यात देण्यात येतील व ती व्यवस्थीत ठेवण्याची जबाबदारी वाहन चालकाची राहील. वाहतूकीच्या वेळी द्रवनत्र पात्रे हाताळतांना निष्काळजीपणा मूळे द्रवनत्र पात्राचे नूकसान झाल्यास त्याची किंमत वाहतूक ठेकेदाराकडून वसूल करण्यात येईल.**

**३८.प्रवासाच्या कालावधीत खाजगी नाक्यावरील टोल टॅक्स, ग्रामपंचायत, नगरपालीका, महानगरपालीका रहदारी कर वाहतूक ठेकेदारास भरावे लागेल.**

**३९.दरकरार निश्चित झालेनंतर वाहतूक करावयाच्या वाहनाच्या आतील सर्व शासकीय साहित्याचा विमा वाहतूकदाराने काढणे बंधनकारक राहील.**

४०.द्रवनत्र वाहतूक करारात जे वाहन करारबध्द झाले असेल तेच वाहन सुस्थितीत वाहतूकीकरीता वापरण्यात येईल, वाहनात त्रूटी दिसून आल्यास वाहन परत करण्यात येईल. यास वाहनमालक जबाबदार राहील.

४१.दरपत्रक मंजूर झालेल्या ठेकेधारकास नियमानूसार आयकर / वस्तू व सेवाकर आणि इतर कर अनुज्ञेय राहील.

४२.व्यवसायीक लिफाफा उघडल्यानंतर ज्या दरपत्रकधारकाचे दर कमी आहे अशा दरपत्रक मंजूर झालेल्या (L-1) ठेकेदारासोबतच वाटाघाटी करण्यात येईल.

४३. **द्रवनत्र वाहतूकीचा करार एक वर्षाच्या कालावधी करिता राहील. (अ.क्रं.२८ लागू )**

**जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन**
**व दुग्धव्यवसाय हिंगोली**

Scanned with OKEN Scanner